CMYK

वडिलांचे छत्र हरवलेल्या मुलीच्या उपचारासाठी अवघ्या दोन तासांत मदत >>पान 2

पत्रकारांच्या मागण्यासंदर्भात राज्य शासन सकारात्मक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >>पान 3

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होमिओपॅथी जीवन गौरव पुरस्काराचे वितरण >>पान 4

**सुविचार**

आपल्या आजुबाजूच्या लोकांसाठी प्रेरणा बना.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 241 ■ सोमवार, दि. 14 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# वर्ष २०२६ अखेर शेतकऱ्यांना १२ तास मोफत वीज

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

■ आर्वी येथे नवीन प्रशासकीय इमारतीसह विविध विकास कामांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन व लोकार्पण ■ पुढील पाच वर्षात राज्यात दरवर्षी वीज बीलाची रक्कम कमी होणार ■ वर्धा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सिंचन व रोजगार निर्मिती होणार

दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी : डिसेंबर २०२६ पर्यंत राज्यातील ८० टक्के शेतकऱ्यांना वर्षभर १२ तास मोफत वीज उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच येत्या पाच वर्षात राज्यात सामान्य नागरिकांचे वीज बील दरवर्षी कमी होणार, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज आर्वी येथे विविध विकास कामांच्या लोकार्पण व भूमिपूजन प्रसंगी केले. तसेच वर्धा जिल्ह्यात लोअर वर्धा प्रकल्प, वाढोणा-पिंपळखुटा आदी सिंचन प्रकल्पांद्वारे शेतीसाठी पाणी व वीज उपलब्ध करून देऊ आणि जिल्ह्यातून जाणाऱ्या समृध्दी महामार्गावरील नोडवर एमआयडीसी उभारुन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आर्वी येथील नवीन प्रशासकीय इमारतीच्या लोकार्पणासह ७२० कोटींच्या विकास कामांचे ई-लोकार्पण व भूमिपूजन झाले. त्यावेळी ते बोलत होते. गृह (ग्रामीण) राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, खासदार अमर काळे, आमदार सर्वश्री दादाराव केचे, सुमीत वानखेडे, समीर कुणावर, राजेश बकाने,माजी खासदार रामदास तडस, जिल्हाधिकारी वान्मथी सी., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हिताचे विविध निर्णय घेऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु केली आहे.



शेतीसाठी १२ तास विजेची शेतकऱ्यांची मागणी होती. यादृष्टीने राज्य शासनाने प्रभावी अंमलबजावणी सुरु केली असून डिसेंबर २०२६ पर्यंत ८० टक्के शेतकऱ्यांना ३६५ दिवस दिवसाला १२ तास मोफत वीज उपलब्ध करुन दिली जाणार आहे. राज्य शासनाने २०२५ ते २०३० पर्यंत राज्यातील वीज वापरकर्त्यांचे वीज बील दरवर्षी कमी करण्याचे नियोजन व तशी कार्यवाही सुरु केली आहे. तसेच ३०० युनीट पर्यंत वीज वापरणाऱ्या मध्यम वर्गीय व गरीब कुटुंबांना सौर ऊर्जेअंतर्गत आणून मोफत वीज देण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

वर्धा जिल्ह्यातील आर्वी विधानसभा मतदार संघात विविध महत्वाच्या विकास कामांचे लोकार्पण झाले आहे. याद्वारे या भागातील विकासाला चालना मिळेल. तसेच येत्या काळात या भागातील लोअर वर्धा प्रकल्प आणि वाढोणा -पिंपळखुटा उपसा सिंचन प्रकल्प कार्यान्वीत होण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी मदत करेल. या सिंचन प्रकल्पांद्वारे या भागातील शेतीला मुबलक पाण्यासोबत मोफत वीज उलब्ध होणार आहे. लोअर वर्धा प्रकल्पावर ५०० मेगावॅट वीज उपलब्ध होणार आहे. तसेच वाढोणा-पिंपळखुटा उपसा सिंचन योजनेला मान्यता देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

वर्धा जिल्ह्यात समृद्धी महामार्गामुळे विकासाला गती आली आहे. तसेच येत्या काळात वर्ध्यातून सुरु होणाऱ्या महत्वाकांक्षी शक्तीपीठ महामार्ग आणि सिंदी येथील ड्रायपोर्टमुळे जिल्हा मध्यभारताचे लॉजिस्टीक केंद्र म्हणून उदयाला येत आहे. या जिल्ह्यातून जाणाऱ्या समृद्धी महामार्गावरील विरुळ नोडला राज्य शासनाकडून लवकरच मान्यता देऊन येथे एमआयडीसी उभारली जाणार आहे.

>> पान ३

## मुंबईत उद्धव ठाकरेंना मोठा धक्का, प्रवक्त्यांचा पक्षाला 'जय महाराष्ट्र', संजना घाडी शिंदे गटात प्रवेश करणार

**मुंबई/प्रतिनिधी :** लोकसभा निवडणुकीत काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गट यांच्या महाविकास आघाडीने घवघवीत यश मिळवले होते. तर भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या महायुतीला पराभवाचा सामना करावा लागला होता. यानंतर विधानसभा निडवणुकीत महायुतीने महाविकास आघाडीचा दारुण पराभव केला. यानंतर आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला गेल्या काही दिवसांपासून एका मागे एक धक्के बसत आहेत.

आता ठाकरेंच्या शिवसेनेच्या प्रवक्ता संजना घाडी आणि त्यांचे पती संजय घाडी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेला ठाकरेंचे शिवसेनेला शिंदे गटाने आणखी एक मोठे खिंडार पाडल्याचे पाहायला मिळत आहे.

संजना घाडी या मुंबईतील शिवसेना ठाकरे गटाच्या एक महत्त्वाच्या नेत्या मानल्या जातात. त्या माजी नगरसेविका देखील राहिलेल्या आहेत. त्या शिवसेनेच्या उपनेते असून काही दिवसांपूर्वी ठाकरे गटाकडून प्रवक्त्यांची यादी जाहीर करण्यात आली होती. या यादीत संजना घाडी यांचे नाव नव्हते, त्यामुळे त्या नाराज असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. मात्र अगदी शेवटच्या क्षणी संजना घाडी यांचे नाव प्रवक्तेपदी जाहीर करण्यात आले होते. त्यामुळे देखील संजना घाडी या नाराज असल्याचे बोलले जात होते.

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून केली होती हत्या; आरोपीची तळोजा जेलमध्ये आत्महत्या

**मुंबई/प्रतिनिधी :** कल्याणमधील १२ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या प्रकरणात तळोजा जेलमध्ये बंद असणाऱ्या आरोपी विशाल गवळीनं आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आली. रविवारी पहाटे तळोजा जेलच्या शौचालयात त्याने आत्महत्या केली असल्याची माहिती पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिली.

डिसेंबर २०२४ मध्ये कल्याण पूर्व परिसरातील चक्कीनाका भागात राहणारी अल्पवयीन मुलगी घरातून बाहेर पडली होती. तिच्यावर विशाल गवळीची नजर पडली. त्याने तिला फूस लावून त्याच्या घरी आणले. तिथे तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. संबधित प्रकार कळू नये म्हणून विशालने त्याच्या घरातच अल्पवयीन मुलीची हत्या केल्याची माहिती पोलीस तपासात उघडकीस आली होती. मुलीची हत्या केल्यानंतर विशालने तिचा मृतदेह घरातील एका बॅगेत भरून ठेवला. मुलीची हत्या केल्यानंतर विशाल घरात थांबून होता.

विशालची पत्नी साक्षी बँकेत नोकरी करत होती. ती संध्याकाळी घरी आली. विशालने तिला घटनाक्रम सांगितला विशालने पत्नी साक्षीच्या मदतीने रात्रीच्या वेळेत घरातील मृतदेहाची विल्हेवाट लावण्याची योजना आखली, व मृतदेह बॅगेत भरला. त्यानंतर विशालने त्याच्या रिक्षा चालक मित्राला घरी बोलवलं. मृतदेह असलेली बॅग रिक्षात ठेवण्यात आली. त्यानंतर विशालने मृतदेह बापगाव कबरस्तान भागातील जंगलात फेकला. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून माग काढून त्यांना अटक केली.

तळोजा जेलमध्ये आरोपीची आत्महत्या : गेल्या चार महिन्यांपासून विशाल हा तळोजा जेलमध्ये होता. विशाल गवळी याने रविवारी पहाटे जेलमधील शौचालयात आत्महत्या केल्याचे आढळून आले. त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी जे .जे .रुग्णालयात पाठवण्यात आलाय. या संदर्भात माहिती पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिली.

पोलिसांनी सलग तीन महिने या प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोपीनं गुन्ह्याच्या वापरलेले हत्यार, गांधारे नदीत फेकून दिलेली पिशवी इतर वस्तू जप्त केल्या होत्या. विशालसह पत्नीला कठोरात कठोर शिक्षा होईल, असे आरोपपत्र जलदगती न्यायालयात दाखल करण्यात आले होते. विशालवर एकूण आठ गंभीर गुन्हे दाखल आहेत. यामध्ये विनयभंग, अनैसर्गिक लैंगिक अत्याचार, चोरी, खुनाचा प्रयत्न, तडीपाराच्या आदेशाचा भंग करणे आदींचा समावेश आहे. गुन्ह्यात जामीन मिळाल्यानंतर विशाल पुन्हा गुन्हे करत होता. अल्पवयीन मुलीच्या हत्येपूर्वी तो जामिनावर बाहेर आला. त्यानंतर त्यानं हे कृत्य केले होते.

हत्येनंतर कल्याण, डोंबिवली शहर परिसरात विशाल गवळीला फाशी द्या, या मागणीसाठी महिला संघटना, सामाजिक संस्था यांनी मोर्चे काढून घडलेल्या घटनेचा निषेध केला होता. विशाल गवळीला फाशी होत नाही तोपर्यंत हे निषेध मोर्चे सुरूच राहतील, असा इशारा सामाजिक संस्थांनी दिला होता. विशालचे तीन भाऊ शाम, नवनाथ आणि आकाश गवळी हे सराईत गुन्हेगार होते. त्यांना कोळसेवाडी पोलिसांनी चार महिन्यापूर्वी ठाणे, रायगड, मुंबई जिल्ह्यातून तडीपार केले आहे.

## मालमत्तेच्या वादातून महिलेची हत्या, आधी सक्तीने दारु पाजली, गळा दाबला आणि मग जाळले

**मुंबई/प्रतिनिधी :** एका प्रॉपर्टी डिलरला आणि त्याच्या भागीदाराला पोलिसांनी एका महिलेची हत्या केल्याप्रकरणी अटक केली आहे. मालमत्तेच्या वादातून ही हत्या केल्याची माहिती समोर आली आहे. ही घटना उत्तर प्रदेश या ठिकाणी घडली आहे. शिवेंद्र यादव आणि त्याचा बिझनेस पार्टनर गौरव या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शिवेंद्र यादव आणि गौरव या दोघांनी अंजली नावाच्या २५ वर्षीय तरुणीला मालमत्तेची कागदपत्रे देण्यासाठी बोलवले. त्यानंतर तिला बळजबरीने दारु प्यायला भाग पाडले. एवढेच नाही तर यानंतर तिचा गळा आवळला आणि तिला जाळले. तिचा मृतदेह या दोघांनी नदीत फेकला. अंजली घरातून गेली ती परत आली नाही म्हणून तिच्या कुटुंबाने तक्रार केली होती. पोलीस बेपत्ता अंजलीचा शोध घेत होते. अंजलीचा मृतदेह तिच्या हत्येनंतर पाच दिवसांनी म्हणजेच शनिवारी पहाटेच्या सुमारा एका नदीजवळ पोलिसांना सापडला. आरोपी शिवेंद्र यादवने अंजलीची हत्या केल्यानंतर त्याच्या पत्नीला आणि वडिलांना व्हिडीओ कॉल केला होता. त्याने तिचा मृतदेह या दोघांना दाखवला होता अशीही माहिती पोलिसांनी दिली आहे.

## नागपूरचे भूषण गवई होणार सरन्यायाधीश

**नागपूर/प्रतिनिधी :** सरन्यायाधीश संजीव खन्ना निवृत्त झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ न्यायमूर्ती भूषण गवई हे सरन्यायाधीश होणार आहेत. नागपूरचे भूषण गवई हे देशाचे ५२ वे सरन्यायाधीश होणार आहे. ते मूळचे नागपूरकर आहेत. भूषण गवई हे विद्यमान सरन्यायाधीशांच्या नंतरचे सर्वोच्च न्यायालयातील सर्वात ज्येष्ठ न्यायमूर्ती आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीच्या दिवशीच भूषण रामकृष्ण गवई सरन्यायाधीशपदाची शपथ घेणार आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू त्यांना शपथ देतील. या निमित्ताने न्यायमूर्ती एम. हिदायतुल्लाह आणि न्यायमूर्ती शरद अरविंद बोबडे यांच्यानंतर नागपूर बार असोसिएशनचा आणखी एक सदस्य सरन्यायाधीश होणार आहे.

संजीव खन्ना यांच्या आधी सरन्यायाधीश पद भूषवणारे माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड हे सुद्धा महाराष्ट्राचेच होते.

कारकिर्द

न्यायमूर्ती भूषण गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी अमरावती येथे झाला.

वकिलीला सुरुवात १६ मार्च १९८५ रोजी केली.

मुंबई उच्च न्यायालयाचे माजी महाधिवक्ता आणि माजी न्यायाधीश राजा एस. भोसले यांच्यासोबत १९८७ पर्यंत काम केले.



न्यायमूर्ती भूषण गवई यांनी मुंबई उच्च न्यायालयात १९८७ ते १९९० या काळात स्वतंत्रपणे वकिली केली.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर न्यायमूर्ती भूषण गवई यांनी १९९० जास्त वकिली केली.

न्यायमूर्ती भूषण गवई हे नागपूर महानगरपालिका, अमरावती महानगरपालिका आणि अमरावती विद्यापीठाचे स्थायी वकील होते.

भूषण गवई ऑगस्ट १९९२ ते १९९३ पर्यंत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी वकील म्हणून भूषण गवई यांची नियुक्ती.

नागपूर खंडपीठात सरकारी वकील म्हणून १७ जानेवारी २००० मध्ये भूषण गवई यांची नियुक्ती

उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांची १४ नोव्हेंबर २००३ मध्ये बढती

भूषण गवई यांची १२ नोव्हेंबर २००५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि पणजी खंडपीठाचे न्यायाधीश म्हणून काम केले

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांची २४ मे २०१९ रोजी नियुक्ती

## मुंबईच्या पाणी प्रश्नावरुन शिवसेना आक्रमक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** देशाची आर्थिक राजधानी समजली जाणाऱ्या मुंबईतील पाणी प्रश्न आता दिवसेंदिवस अधिक चिघळत चालला आहे. ऐन उन्हाळ्यात जेव्हा पाण्याची सर्वाधिक गरज असते, अशा वेळी टँकरचालकांचा संप सुरु आहे. आदित्य ठाकरेंनी शिवसेनेच्या विभाग प्रमुख आणि पदाधिकाऱ्यांची रविवारी तातडीने बैठक घेतली आणि या प्रश्नावर आक्रमक होण्याचे निर्देश दिलेत. यावेळी पत्रकारांशी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की, मुंबईतील पाण्याचा प्रश्न गंभीर झालाय, यामुळे सामाजिक दरी निर्माण झालीय. याबाबत देण्यात आलेली ४८ तासांची दिलेली मुदत संपत आलीय, त्यामुळे आता आम्ही प्रत्येक वॉर्डात मोर्चा काढून प्रशासनाला जाब विचारणार, असा इशारा आदित्य ठाकरे यांनी यावेळी दिलाय.

टँकर चालकांच्या संपामुळे मुंबईकरांना मोठा फटका : या बैठकीत

### प्रत्येक वॉर्डामध्ये मोर्चा काढून जाब विचारण्याचा आदित्य ठाकरेंचा इशारा

मुंबईच्या विविध ज्वलंत समस्यांवर चर्चा करण्यात आली. पाणी प्रश्न, रस्त्यांवरील खड्डे, नालेसफाई या संदर्भात चर्चा करण्यात आली. या बैठकीला आमदार मनोज जामसुतकर, मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर, मुंबईतील विभाग प्रमुख आणि इतर महत्त्वपूर्ण पदाधिकारी उपस्थित होते. आदित्य पुढे म्हणाले, टँकर चालकांच्या संपामुळे मुंबईकरांना मोठा फटका बसत आहे. संपावर जाण्यापूर्वी टँकर असोसिएशनने एक आठवड्याची नोटीस प्रशासनाला दिली होती. मात्र त्याची कोणतीही दखल घेण्यात आली नाही. नोटीस दिल्यानंतर सरकारने कोणतीही कार्यवाही केली नाही, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली.



महाराष्ट्राला लुटणे हीच भारतीय जनता पक्षाची मानसिकता : मुंबईचे प्रशासक मुख्यमंर्त्याच्या आदेशाने काम करीत आहेत, मात्र या परिस्थितीत मुख्यमंर्त्यांनी अद्याप कोणतेही आदेश दिलेले नाहीत, हे अत्यंत दुर्दैवी आहे, असे आदित्य म्हणालेत. मुंबईची आर्थिक हत्या होत आहे, मात्र याकडे सत्ताधाऱ्यांचे पूर्णतः दुर्लक्ष झालंय, अशी टीका त्यांनी केली. महाराष्ट्राला लुटणे हीच भारतीय जनता पक्षाची मानसिकता असल्याची टीका त्यांनी यावेळी केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केला, औरंगजेबाच्या कबरीचा समाधी असा उल्लेख केला त्यावर त्यांनी जोरदार टीका केलीय.

CMYK

## डॉ बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता !

विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची आज १३४ वी जयंती. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन! जागतिक कीर्तीचे विचारवंत अशी ओळख आलेल्या विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. आधुनिक भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे विचारवंत म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जगभर ओळख आहे मात्र डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ज्या जाहिराती किंवा शुभेच्छा संदेश दिल्या जातात त्यात डॉ बाबासाहेब आंबेडकरांची ओळख दलितांचे उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार अशीच करून दिली जाते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे दलीत उद्धाराचे कार्य तर जगजाहीर आहे. जगाला हेवा वाटेल अशी राज्यघटना त्यांनी देशाला दिली. त्यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच विविध जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असलेला आपला देश एकसंघपणे बांधला गेला आहे. भारतासारखी राज्यघटना नसल्याने भारताच्या शेजारी असलेल्या देशांची आज काय अवस्था झाली आहे हे आपण पाहतोच आहे. त्यामुळे त्यांची दलीत उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ही ओळख यथायोग्यच असली तरी त्यांचे कार्य केवळ एवढ्या पुरतेच मर्यादित नाही. थोर अर्थतज्ज्ञ, महिलांचे उद्धारक, कृषी तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, जलतज्ज्ञ इतिहास तज्ज्ञ, समाज शास्त्रज्ञ, कायदेपंडित, धर्म चिकित्सक, राजनीती तज्ज्ञ, कामगार नेते, शांतीचे उपासक, कलाप्रेमी, लेखक, पत्रकार असे विविध पैलू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे हे विविध पैलू कायम दुर्लक्षित केले जातात म्हणूनच मी माझ्या महिलांचे उद्धारक डॉ बाबासाहेब आंबेडकर व डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषक धोरण या मागील दोन लेखात डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी केलेले कार्य आणि जलतज्ज्ञ डॉ बाबासाहेब आंबेडकर या दोन पैलूंची ओळख करून दिली होती आज मी डॉ बाबसाहेब आंबेडकरांची पत्रकार म्हणून असलेल्या पैलूंची ओळख करून देणार आहे. डॉ बाबसाहेब आंबेडकरांचा पत्रकारितेचा प्रवास मूकनायक पासून सुरू झाला. नंतर हा प्रवास बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारत पर्यंत सुरूच राहिला. सामाजिक आणि राजकीय ध्येयासाठी स्वतःचे वर्तमानपत्र असावे असे डॉ बाबसाहेब आंबेडकरांना वाटले म्हणूनच त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. दलितांवर होणाऱ्या अन्याय,अत्याचाराला वाचा फोडण्याचं काम मूकनायक पाक्षिकानं निष्ठेनं केलं. डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते. सुरुवातीला पांडुरंग नंदराम भटकर पाक्षिकाचे संपादक होते. त्यानंतर मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी असणारे ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे संपादक पदाची जबाबदारी आली. मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे, ही जाणीव निर्माण केली. मूकनायक पत्रात विविध विचार, वर्तमानसार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम, समाचार, कुशल प्रश्न, शेला पागोटे ही सदरे होती. मूकनायक एप्रिल १९२३ मधे बंद पडले. इ.स. १९२४ मध्ये डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले. ३ एप्रिल १९२४ रोजी बहिष्कृत भारत पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी २९ जून १९२८ रोजी समता हे वृत्तपत्र सुरू केले. हे समाज समता संघाचे मुखपत्र होते. २४ फेब्रुवारी १९३० रोजी त्यांनी जनता तर ४ फेब्रुवारी १९५६ मध्ये प्रबुद्ध भारत हे वृत्तपत्र सुरू केले. इ.स. १९४४ मध्ये बाबासाहेबांनी ''आम्ही शासनकर्ती जमात बनणार'' या शीर्षकाखाली जनता वृत्तपत्रात लेख लिहिला. या वृत्तपत्रांद्वारे आपल्या विचारांनी त्यांनी स्पृश्य आणि अस्पृश्यांना जागृत केले. त्यांची लेखनी झुंजार, क्रांतिकारी आणि प्रभावी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सर्व वृत्तपत्रे मराठी भाषेमध्ये प्रकाशित झालेत कारण मराठीच त्यावेळेची सामान्य जनतेची भाषा होती. कारण बाबासाहेबांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र होते आणि मराठी तिथली लोकभाषा आहे. बाबासाहेब इंग्रजी भाषेचे ही प्रकांड विद्वान होते, परंतु त्यांनी आपली वृत्तपत्रे मराठी भाषेत यामुळे प्रकाशित केली की त्यावेळी महाराष्ट्रातील बहुतांश दलित जनता जास्त शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीत समजू शकत होती. गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे की, ''या मुकनायकाने बहिष्कृत भारतामधील लोकांना प्रबुद्ध भारताकडे नेले. बाबासाहेब महान पत्रकार होते.'' पत्रकार महामानव डॉ बाबसाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!!

# वडिलांचे छत्र हरवलेल्या मुलीच्या उपचारासाठी अवघ्या दोन तासांत मदत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा संवेदनशील पुढाकार

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सिंदखेडराजा परिसरातील एका गावात रसवंतीच्या मशिनमध्ये केस अडकून गंभीर जखमी झालेल्या १६ वर्षीय मुलीच्या उपचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदशीलतेमुळे अवघ्या दोन तासात एक लाख रुपयांची मदत मिळाली असून वेळीच मदत मिळाल्याने मुलीच्या आईने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.

याविषयी अधिक माहिती देताना मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक म्हणाले, रसवंती चालवताना या मुलीचे केस अचानक मशिनमध्ये गुंतले आणि तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. गावकरी आणि सरपंच निवृत्ती कठोरे यांनी तात्काळ मुलीला जालना येथील कलावती रुग्णालयात दाखल



केले. रुग्णालयाने त्वरित उपचार सुरू केले. दरम्यान 'समाजभान' या सामाजिक संस्थेने औषधाच्या खर्चाची जबाबदारी उचलली. या घटनेची माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षापर्यंत पोहोचली. मुलीच्या कुटुंबाची हलाखीची परिस्थिती आणि घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन कक्षाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार अवघ्या दोन तासांत एक लाख रुपयांची मदत मंजूर केली. रुग्णालयानेही उपचाराचा उर्वरित खर्च उचलला.

### कर्तृत्ववान मुलगी

वडिलांच्या अकाली निधनानंतर या १६ वर्षीय मुलीने कुटुंबाची जबाबदारी खांद्यावर घेतली होती. अभ्यासात हुशार असलेल्या १९ वर्षीय मोठ्या बहिणीला स्पर्धा परीक्षेची तयारी आणि नऊ वर्षीय भावाला शालेय शिक्षणासाठी प्रेरणा देत ती स्वतः गावातील बसस्थानकावर रसवंतीचा व्यवसाय करत होती. आईच्या मदतीने कुटुंबाला हातभार लावणाऱ्या या मुलीवर आलेल्या संकटाने सर्वांचे मन सुन्न झाले होते. वेळीच मिळालेल्या उपचार आणि आर्थिक मदतीमुळे तिला नवजीवन मिळाले.

### आईने मानले आभार

डोक्याला गंभीर दुखापत आणि मेंदूवरील सूज यामुळे मुलीच्या उपचारासाठी सुमारे चार लाख रुपये खर्च अपेक्षित होता. मात्र, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या मदतीनंतर रूग्णालय प्रशासनाने उर्वरित उपचारासाठीचा खर्च माफ केला. यामुळे मुलीच्या कुटुंबावरील आर्थिक ताण कमी झाला. आमदार नारायण कुचे यांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी तातडीने रूग्णालयात जाऊन उपचार सुरु असलेल्या मुलीची भेट घेतली. शिवाय मुलीचा पुढील संपूर्ण शैक्षणिक खर्च उचलण्याची तयारी दर्शविली. दरम्यान सर्वांच्या सहकार्यामुळे माझ्या मुलीचे प्राण वाचले. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष प्रमुख, आमदार, सरपंच, सामाजिक संस्था आणि डॉक्टरांची आयुष्यभर ऋणी राहीन, अशी भावना मुलीच्या आईने व्यक्त केली

# राजधानी दिल्लीशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जिव्हाळ्याचे नातं ..

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यातील बराच काळ दिल्लीत गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दिल्लीचे एक वेगळे नातेही निर्माण झाले. ब्रिटिश सरकारच्या म्हणजे प्रांतीय मंत्रिमंडळात ते कामगार मंत्री होते त्यामुळे दिल्लीत त्यांचे वास्तव्य असायचे. या काळात ते देशभर फिरत होते. जनतेच्या समस्या जाणून घेत होते आणि मंत्री म्हणून त्यावर निर्णय घेत होते.

दिल्लीत असताना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाच्या उभारणीत मोठे योगदान दिले. याच काळात, म्हणजे दिल्लीत असताना त्यांनी देशावर दीर्घकालीन परिणाम करणारे निर्णय घेतले. मग ते कामगार कायदे असोत की महिलांच्या अधिकाराचे निर्णय असोत. याच काळात बाबासाहेब आंबेडकर यांनी अहोरात्र मेहनत करून राज्यघटनेचा मसुदा तयार केला तसेच त्यानंतर हिंदू कोड बिल तयार केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा दिल्लीत आलेत तेव्हा ते एकटे राहत असत. माता रमाईचे निधन झाल्यानंतर तसे बाबासाहेब खूप दुखावले होते. पण आपल्या प्रकृतीच्या तपासणीसाठी त्यांचे मुंबईला नियमितपणे वैद्यकीय डॉक्टरांचा सल्ला घेण्यासाठी जावे लागत असे. तिथेच डॉक्टर मालवणकर यांच्याकडे डॉ सविता कबीर यांची डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी भेट झाली आणि त्यांचे कोर्ट मॅरेज झाले. याच काळात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अनेक ग्रंथाचे लिखाण केले. देशाच्या फाळणीवरील त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ त्यांनी दिल्लीतच पूर्ण केला. त्यानंतर त्यांच्या आयुष्यातील शेवटचा जगप्रसिद्ध असलेला ग्रंथ ''बुद्ध आणि त्यांचा धम्म '' दिल्लीतच लिहीला. या काळात दिल्लीतील लोकांशी त्यांचे संबंध आले. हे नाते दृढ होत गेले.



उत्तर भारतीयांचा गोतावळा त्यांच्या भोवती असायचा. त्यांना बघायला, ऐकायला, भेटायला लोक सतत येत असत. सुरूवातीला बाबासाहेब यांचे निवास १ हार्डिंग एवेन्यु (गुबंद कोठी) येथे होते. सध्या याला टिळक मार्ग म्हणतात. त्यांचे शेवटचे दिवस सीव्हील लाईन्स येथील २६ अलीपुर रोड येथील कोठीत गेले. भारत सरकारने बाबासाहेब यांच्या स्मरणार्थ या ठीकाणी मोठे स्मारक बांधले आहे.

दिल्लीत असताना बरेच लोकांचा त्यांच्या परीचय झाला. हा ऋणाणुबंध वाढला. बाबासाहेबांना बरेच लोक आपले सुख दुःख सांगत असत. बाबासाहेब यांच्या आऊट कार्टरमध्ये त्यांचे निकटवर्ती सोहनलाल शास्त्री, जे विधी विभागात अधिकारी होते, ते राहत असत. त्यांचा बाबासाहेबांशी जवळीकतेचा स्नेह होता. त्यांच्या जवळचे असलेले चौधरी देवीदास जी यांचे ही बाबासाहेब यांच्या दिल्लीतील घरी येणे जाणे होत असे. चौधरी देवीदास यांचा मुलगा लाला हरीचंद आणि सुन भुरिया देवी यांना २ ऑक्टोबर १९४९ रोजी पुत्र रत्न झाले आणि या बालकाचे नाव गुलाब सिंग असे ठेवण्यात आले. ही आनंदाची बातमी बाबासाहेबांना दयायची होती. त्या दिवशी बाबासाहेब दिल्लीत नव्हते. ते दोन दिवसांसाठी काश्मीर दौऱ्यावर होते. बाबासाहेब काश्मीरहून परत आल्यावर कळाल्यावर चौधरी देवीदास यांनी लाडुचा डबा घेऊन बाबासाहेबांचे घर गाठले. तेव्हा बाबासाहेब त्यांच्या मित्र आणि आप्तांसोबत चर्चेत दंग होते. बाबासाहेबांनी चौधरी देवीदास यांना गेटमधून येताना बघून देवीदास यांचे अभिवादन स्वीकारले. देवीदास हे अंत्यत हर्षामध्ये बाबासाहेबांना सांगू लागले की त्यांना नातु झालेला आहे. मिठाई त्याच्या आनंदात आणली आहे. बाबासाहेबांना मधुमेह असल्यामुळे त्यांनी ती खाल्ली नाही मात्र, सोबत असणाऱ्यांमध्ये वाटून दलि. नातवाचे नाव गुलाब सिंग ठेवण्यात आले असल्याचे चौधरी नी बाबासाहेबांना सांगितले. त्यावर बाबासाहेब यांनी शुभेच्छा देत विचारले, आई आणि बाळ दोघेही बरे आहेत ना. यावर चौधरी यांनी होकारार्थी उत्तर दिले.

बाबासाहेब म्हणाले, गुलाब सिंग हे नाव काही बरे वाटत नाही. त्यांनी बाजुला ठेवलेले वर्तमान पत्र उचलले, त्यात शांतीस्वरूप हे नाव वाचले आणि चौधरी यांना सांगितले की आता तुझ्या नातवाचे नाव गुलाब सिंग हे न ठेवता तु शांतीस्वरूप असे ठेव. त्याप्रमाणे चौधरी देवीदास यांनी कागदोपत्री नाव बदलून शांतीस्वरूप हे नाव ठेवले.

पुढे शांतीस्वरूप यांनी भारत सरकारच्या गृह खात्यात नोकरी केली. निवृत्त झाल्यानंतर त्यांनी 'सम्यक' या नावाने प्रकाशन संस्था सुरू केली. उत्तर भारतातील नवोदति लेखकांना त्यांनी संधी दिली. वर्ष २०२० मध्ये त्यांचे निधन दिल्ली येथे झाले. आताही त्यांची प्रकाशन संस्था आहे. हयात असेपर्यंत ते सर्वांना मोठया अभिमानाने सांगत, माझे 'शांतीस्वरूप' हे नाव बाबासाहेबांनी ठेवले आहे. अशा अनेक आठवणी बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिल्लीतील आहेत.

प्रज्ञा सूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वच स्तरातील लोकांमध्ये लोकप्रिय होते. आजही राजधानीत त्यांच्या आठवणी संसदेपासून ते दिल्लीतील लोकांमध्ये जाग्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा !

**अंजु निमसरकर-कांबळे**
माहिती अधिकारी

# धुळे शहरास दोन वेळेस भेट देणारे डॉ. बाबासाहेब

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दोन वेळेस धुळे शहरास भेट दिली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित धुळे येथील ज्येष्ठ पत्रकार ललित चव्हाण यांनी या आठवणींना दिलेला हा उजाळाष्ठ

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सर्वत्र साजरी होणार आहे. साहजिकच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या जिल्ह्यात किंवा शहरात आले होते. त्यावेळी काय घडले, वातावरण कसे होते, या गोष्टींना उजाळा दिला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर धुळ्यात दोन वेळा आले होते.



डॉ. आंबेडकर त्यांच्या ६५ वर्षाच्या आयुष्यात धुळ्यात दोन वेळा आले होते. पहिल्यांदा डॉ. आंबेडकर २९ ते ३१ जुलै १९३७ ला धुळ्यात आले होते. त्यानंतर १७ जून १९३८ ला धुळ्यात आले होते. त्याबाबतच्या ठळक नोंदी आहेत. पहिल्यावेळी बाबासाहेब न्यायालयीन कामकाजासाठी आले होते.

शिरपूर तालुक्यातील वाघाडी येथील हुलेसिंग मोतीराम जहागीरदार-पाटील आणि मगन मथुरादास वाणी आणि इतर १६ जण यांच्यात बैल पोळयाच्या मुद्द्यावरून वाद झाला होता. यात जहागीरदार यांनी पोळ्याच्या मिरवणुकीत आपले बैल पुढे ठेवण्यासाठीचा अर्ज केला होता. तत्कालिन प्रांताधिकार्यांनी जहागीरदार यांच्या विरोधात निर्णय दिला. त्यावर जहागीरदार यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी तथा जिल्हा न्याय दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता. या अर्जाच्या सुनावणीसाठी जहागीरदार यांचे वकील प्रेम सिंह तंवर आणि सी. एम. मुळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना धुळे येथे न्यायालयीन कामकाजासाठी आमंत्रित केले होते.

बाबासाहेबांच्या युक्तीवादामुळे निकाल जहागिरदार यांना अनुकुल असा लागला. न्यायालयीन कामकाजाच्या निमित्त सर्वप्रथम २९ जुलै १९३७ ला बाबासाहेबांचे धुळ्यात पहिल्यांदा आगमन झाले. त्यावेळी समतावादी दलित मंडळ, प्राणयज्ञ दलाच्या कार्यकत्यांनी त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी पार पाडली. त्यात पुनाजीराव लळींगकर, कॅप्टन भिमराव साळुंखे, सखाराम केदार, सुखदेव केदार, देवराम अहिरे, ए.आर.सावंत यांनी बाबासाहेबांच्या स्वागताची तयारी केली होती. बाबासाहेब धुळयात येणार असल्याची बातमी सर्वदूर पोहचल्याने खानदेशातल्या गावागावातून पहाटे चारपासून शेकडो नागरिकांचे जत्थे धुळ्यातील रेल्वेस्थानकाजवळ जमा होऊ लागले होते. सकाळी सव्वासातच्या सुमारास बाबासाहेबांचे रेल्वेस्थानकावर जल्लोषात स्वागत करण्यात आले. धुळ्यात त्यावेळी बाबासाहेबांचा दोन दिवसांचा मुक्काम होता. लळींग कुरणातील लांडोर बंगल्यात बाबासाहेब मुक्कामी होते.

न्यायालयीन कामकाजाशिवाय बाबासाहेबांनी त्यावेळी धुळ्यात काही उपक्रम राबवित सर्वसामान्य नागरिकांशी संवाद साधला. धुळे शहरातील विजयानंद चित्रमंदिर म्हणजे आजचे स्वस्तिक चित्रमंदिर मध्ये झालेल्या कार्यक्रमातून बाबासाहेबांनी दलित जनतेला मार्गदर्शन केले. लांडोर बंगल्यावर मुक्कामी असताना पुनाजी लळींगकर बाबासाहेबांना भेटायला गेले. लळींगकरांच्या घरी भोजन घेतल्यानंतर बाबासाहेबांनी लांडोर बंगल्याच्या आवारात अनेक कार्यकर्तांच्या भेटी घेतल्या. धुळे शहरातील गरूड वाचनालय, इतिहासाचार्य राजवाडे संशोधन मंडळाला बाबासाहेबांनी भेटी दिल्या. त्याठिकाणी त्यांनी अभिप्राय देखील नोंदविले. आण्णासाहेब लळीगकरांची बहिण कृष्णाबाई यांनी स्व-रचित अहिराणी गीतांचे गायन करीत आणि धुळे तालुक्यातील नरव्हाळ येथील शाहीर रतन जाधव यांनी बाबासाहेबांचे मनोरंजन केल्याचे सांगितले जाते. बाबासाहेब ३१ जुलैस मुंबईला निघाले तेव्हा त्यांनी आण्णासाहेब लळींगकरांना नंदुरबार येथे जाऊन आदिवासी विद्यार्थ्यांसाठी काम करण्यास सांगितले. लळींगकरांनी तत्कालीन जिल्हाधिकारी कॅप्टन कुंहे यांच्याकडून नंदुरबार येथे साक्रीनाका परिसरात नदी किनारी जागा मिळवली. त्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर छात्रालयाची स्थापना केली. अनेक विद्यार्थी या छत्रालयात राहिले आणि शिकलेत. याचवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धुळ्यातील नेहरू चौकात हरीजन सेवक संघाच्या राजेंद्र छात्रालयास भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. छात्रालयाच्या पुस्तिकेत बाबासाहेबांच्या हस्ताक्षरातील अभिप्राय आहे. बाबासाहेब ज्या लांडोर बंगल्यावर थांबले होते, त्या घटनेला उजाळा देण्यासाठी दरवर्षी ३१ जुलैस त्यांचे हजारो अनुयायी लांडोर बंगल्यावर एकत्र येतात.

**ललित चव्हाण**
ज्येष्ठ पत्रकार, धुळे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### अश्लील गाणी वाजवल्या प्रकरणी गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : अंधेरीतील मेट्रो स्थानक परिसरात राम नवमीच्या दिवशी काढलेल्या मिरवणुकीत अील गाणी वाजवल्याप्रकरणी आयोजकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सार्वजनिक रस्त्यांवर अशा प्रकारची गाणी वाजविल्याने अंधेरी विभागातील सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविण्यात आला असून राजेश बिडानिया, अमित पाठक आणि ओमकार दळवी अशी आयोजकांची नावे आहेत.

अंधेरी येथे राम नवमीच्या दिवशी मिरवणूक आयोजित करण्यात आली होती. या मिरवणुकीत २०० ते २५० व्यक्तींचा समावेश होता. मिरवणूक कुर्ला मार्गावरून म रोळ नाक्याच्या दिशेने जात असताना महिलांचा अपमान होईल अशा शब्दरचना असणारी गाणी ध्वनिक्षेपकातून वाजविण्यात आली. त्यामुळे तीनही आयोजकांवर पोलिसांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविण्यात आला.

### शिर्डीत १२५ किलो वजनाचा 'बजरंग गोटा' उचलण्याची स्पर्धा; २२ तरुणांनी उचलला गोटा

दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी** : शनिवारी (१२ एप्रिल) देशभरात हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. भारतातील प्रत्येक राज्यात हनुमान जयंती वेगवेगळ्या वेळी आणि वेगवेगळ्या पद्धतीनं साजरी केली जाते. शिर्डीतील साई मंदिरात हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. तसेच यावेळी शक्तीचं प्रतिक असलेल्या १२५ किलो वजनाचा बजरंग गोटा उचलण्याची स्पर्धा पार पडली.

साईबाबांच्या शिर्डीत हनुमान जयंती : हनुमान जयंती निमित्तानं शिर्डीतील क्रांती युवक मंडळाच्या वतीनं सालाबादप्रमाणं यंदाही हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. क्रांती युवक मंडळाकडून दरवर्षी शिर्डीच्या साई मंदिराजवळील हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव उत्सव मोठ्या भक्तीभावात साजरा करण्यात आला. शनिवारी पहाटे साडे सहा वाजता हनुमानाच्या मूर्तीला गंगेच्या पाण्याने मंगलस्नान घालण्यात आले. त्यानंतर हनुमानाची महाआरती करून भक्तांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

बजरंग गोटा उचलण्याची स्पर्धा : मंदिर परिसरात १२५ किलो वजनाचा बजरंग गोटा उचलण्याची स्पर्धा पार पडली. स्पर्धेच्या सुरूवातीला शिर्डी ग्रामस्थांच्या हस्ते बजरंग गोटाचं पूजन करण्यात आलं. यावेळी परिसरातील तरुणांनी मोठ्या जोशात 'जय श्रीराम' आणि हनुमानाचा जयजयकार करत गोटा उचलण्याचा प्रयत्न केला. मात्र, येथील २२ तरुणांनी हा १२५ किलो वजनाचा बजरंग गोटा उचलला. शेवटी मंडळाचे अध्यक्ष सचिन तांबे यांनी गोटा उचलून स्पर्धेचा समारोप केला.

साईबाबांच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी : हनुमान जयंती आणि रविवारची सुट्टी जोडून आल्यानं शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. हनुमान जयंती निमित्ताने साईबाबांच्या म ूर्तीला कोट्यवधी रुपयांचे दागिने घालण्यात आले होते. तसेच साईबाबांच्या दुपारच्या मध्यान्ह आरतीच्या वेळी साईबाबांच्या समाधीसमोर बाल हनुमानाची प्रतिमा ठेवण्यात आली होती.

### ऐन उन्हाळ्यात टँकर संघटनेचा संप, मुंबईकर चिंतेत

**मुंबई/प्रतिनिधी** :ऐन उन्हाळ्यात मुंबई वॉटर टँकर असोसिएशनने संप पुकारला आहे. या संपामुळे म ुंबईकरांच्या चिंतेत वाढ झाली आहे. भरमसाठ भूजल उपसा टाळण्यासाठी मुंबई महापालिकेने मुंबई वॉटर टँकर असोसिएशनला काही अटी घातल्या आहेत. या अटींच्या विरोधात मुंबई वॉटर टँकर असोसिएशनने संप पुकारला आहे.

भूजलस्रोत हा किमान २०० चौरस मीटरच्या भूखंडावर असेल तरच त्याचा वापर पाणी घेण्यासाठी करता येईल, अशी अट मुंबई महापालिकेने टँकरवाल्यांसाठी लागू केली आहे. या अटीला मुंबई वॉटर टँकर असोसिएशनचा विरोध आहे. मुंबईत ही अट कशी मान्य करायची आणि एवढा मोठा भूखंड कुठून आणायचा ? असा प्रश्न मुंबई वॉटर टँकर असोसिएशनने उपस्थित केला आहे. उन्हाळ्यात जिथे पाणी टंचाई आहे तिथल्या नागरिकांच्या सोयीसाठी टँकरने पाणीपुरवठा केला जातो. या पाणीपुरवठ्याकरिता टँकरना भूजलस्रोतातून पाण्याचा मोठ्या प्रमाणात उपसा हा करावा लागतो. महापालिकेच्या अटीचे पालन करायचे ठरवले तर मुंबईकरांसाठी शहराबाहेरुन पाणी आणावे लागेल. हे करणे वेळखाऊ आणि खर्चिक आहे. यामुळे मुंबई महापालिकेने भूजलस्रोत हा किमान २०० चौरस मीटरच्या भूखंडावर असावा ही अट मागे घेण्याची मागणी मुंबई वॉटर टँकर असोसिएशनने केली आहे.

सध्या एप्रिल महिना सुरू आहे. आताच मुंबईत अनेक ठिकाणी पाणीटंचाई निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे. अजून पूर्ण मे महिना बाकी आहे. यानंर जून उजाडणार आहे. यामुळे पाण्याच्या टँकरवर कडक निर्बंध नको. एकावेळी जास्तीत जास्त पाणी भूजलस्रोतातून उपसण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी टँकरच चालक – मालक करत आहेत. मागणी अमान्य झाली अथवा दीर्घ काळ रेंगाळली तर बेमुदत संप करू, जून महिन्यात अनेकदा मुंबईकरांना काही दिवस तीव्र पाणीटंचाई जाणवते. या काळात संप सुरू असेल मुंबईकरांचे हाल होतील.

# पत्रकारांच्या मागण्यासंदर्भात राज्य शासन सकारात्मक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील पत्रकारांच्या मागण्यासंदर्भात राज्य शासन सकारात्मक आहे. ज्येष्ठ पत्रकारांसाठी सुरू करण्यात आलेल्या आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेच्या अटीसंदर्भात राज्यातील पत्रकार संघटनांच्या सूचना घेऊन योजनेतील बदलाबाबत नव्याने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**

मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघाच्या पत्रकारांच्या प्रलंबित प्रश्नांसदर्भात आज मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. यावेळी पत्रकारांच्या प्रलंबित मागण्यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बालसिंह चहल, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.ज्येष्ठ पत्रकारांसाठी आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेत अनुभवाची अट ३० वर्षे वरुन २५ वर्षे करण्याची तसेच वयाची अट ६० वर्षे वरून ५८ वर्षे करण्याची मागणी पत्रकार संघटनेने केली आहे. या योजनेच्या अटीसंदर्भात राज्यातील विविध पत्रकार संघटनेच्या सुचना मागवून घेऊन नव्याने प्रस्ताव सादर करावे. तसेच सन्मान योजनेत देण्यात येणाऱ्या वाढीव मानधनाच्या रक्कमे संदर्भात योग्य तो मार्ग काढण्यात येईल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.



पत्रकारांसाठी कांदिवली येथे गृहनिर्माण योजना राबविण्यात येत आहे. या सदनिकांसाठी आकारण्यात येणारे दर कमी करण्यासंदर्भात म्हाडाने योग्य तो तोडगा काढावा. शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी कल्याण निधीमधून पत्रकारांच्या आजारपणात देण्यात येणाऱ्या एक लाखापर्यंतच्या मदतीची रक्कम वाढविण्यासंदर्भात विचार केला जाईल. तसेच पत्रकारांच्या आरोग्य योजना महात्मा फुले जनआरोग्य योजनेशी सलंग्न करून यादीतील आजारशिवाय इतर आजारांच्या प्रतिपूर्तीसंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. अधिस्विकृतीधारक पत्रकारांना एसटी महामंडळाच्या शिवनेरी व शिवाई बसमध्ये सवलत देण्यासंदर्भात एसटी महामंडळाने योग्य तो निर्णय घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. सध्या मंत्रालयात प्रवेशासाठी 'फेशियल रिकग्नेशन' यंत्रणा राबविण्यात येत आहे. या यंत्रणेअंतर्गत पत्रकारांना मंत्रालयात प्रवेशासाठी येत्या पंधरा दिवसात कार्यवाही पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.यावेळी मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदू जोशी, संघाचे सरचिटणीस दीपक भातुसे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते

## जिल्ह्यात पूर आणि पाणीटंचाईवर उपाय म्हणून जलताऱ्यांची मोहीम जोमात

### जिल्ह्यात सर्वाधिक जलतारे करणारे पहिले गाव ठरले लाडेगाव

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी** : जिल्ह्यातील लाडेगाव हे गाव सध्या जलसंधारण क्षेत्रात आदर्श ठरत असून, पूरस्थिती आणि पाणीटंचाई यावर उपाय म्हणून जलतारा उपक्रम राबवण्यात येत आहे. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून गावात चारशेहून अधिक जलताऱ्यांची निर्मिती पूर्ण झाली असून, पंधराशे जलताऱ्यांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.



या उपक्रमासाठी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस., उपजिल्हाधिकारी कैलास देवरे, तहसीलदार कुणाल झालटे आणि कृषी विभागाचे उपविभागीय अधिकारी संतोष वाळके यांचे मार्गदर्शन लाभत आहे. ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था आणि ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग उपक्रमाच्या यशाचे गमक ठरत आहे.

मोठ्या शेतकऱ्यांसह अनेक शेतकऱ्यांनी स्वखर्चाने जलताऱ्यांची निर्मिती केली आहे. गावातील पूरस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक ठिकाणी डोह व नाल्यांचे काम सुरू आहे. विशेषतः जागतिक महिलादिनी जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः श्रमदान करून ग्रामस्थांना प्रेरणा दिली.या उपक्रमासाठी डॉ. निलेश हेडा यांनी शंभर तास जेसीबीचा वेळ देण्याची घोषणा केली आहे. 'एम.आर.जी.एस.' अंतर्गत एकशे अकरा फायलींना मंजुरी मिळालेली असून, प्रत्येक थेंब शिवारात हा मंत्र घेऊन गाव एक चळवळ बनत आहे. यामध्ये पवन मिश्रा, श्याम सवाई, महेश सुरजुसे, सचिन सिदगुर, निखिल घोंगडे, नितीन सवाई, संजय कपाटे आणि अन्य ग्रामस्थांचे योगदान उल्लेखनीय आहे. अपेक्षा होमिओ सोसायटी संवर्धन समाज विकास संस्था आणि सर्व धर्म मित्र मंडळ, कारंजा हेही उपक्रमात सहभागी झाले आहेत.

## नाशिकमध्ये भयंकर प्रकार, तडीपार गुंडाकडून धावत्या बसला रिक्षा आडवी घालत नग्न होऊन महिलेचा विनयभंग

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकमधून एक संतापजनक बातमी समोर येत आहे. रिक्षा चालकाने भररस्त्यात नग्न होत अील हावभाव करत महिलेचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. संशयित आरोपी सराईत गुन्हेगार असून तो शहरातून तडीपार असल्याची माहिती समोर आली आहे. महिलेच्या तक्रारीनंतर नाशिकच्या मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित रिक्षाचालक मिजान रजा ऊर्फ मल्ला सादिक शेख याला मुंबई नाका पोलिसांनी अटक केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बोधले नगर परिसरातून सिटीलिंकची बस येताना ती अचानक बंद पडली. यामुळे बसमधील प्रवासी दुसऱ्या बसची वाट पाहत खाली उतरले. त्यावेळी एक रिक्षाचालक प्रवाशांना घेऊन जाण्यासाठी विचारणा करण्यासाठी आला होता. त्याने फिर्यादी महिलेला विचारले की, तुमको किधर जाना है, यावेळी महिलेने रिक्षा चालकाला नकार दिला. यानंतर महिला बसची वाट बघत असता संशयिताने तुमको किधर जाना है, असे म्हणत हाताने अील इशारे केले. यानंतर महिला घाबरून गेली होती. काही वेळाने सिटीलिंकची बस तेथे आल्याने प्रवासी बसमध्ये बसले. बस द्वारकेच्या दिशेने निघाली असता रिक्षाचालक तिचा पाठलाग करत आहे, असे महिलेला जाणवले. द्वारका सर्कल येथे सिटीलिंक बस आली असता रिक्षाचालक आणि त्याच्या मित्राने रिक्षा बसला आडवी लावली. यानंतर रिक्षाचालकाने कपडे काढून तो नग्न झाला. त्याने सिटीलिंक बस चालक आणि वाहकाला देखील मारहाण केली. तसेच बसवर दगड फेकत बसच्या काचादेखील फोडल्या. यानंतर घाबरलेल्या प्रवाशांनी पोलिसांना फोन केला. काही वेळातच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि संशयित आरोपींना ताब्यात घेतले. संशयित रिक्षाचालक मिजान रजा ऊर्फ मल्ला सादिक शेख हा भद्रकाली, जुने नाशिक या परिसरात राहणारा आहे.

पान १ वरून...

## वर्ष २०२६ अखेर शेतकऱ्यांना १२ तास मोफत वीज

या माध्यमातून उद्योगासाठी इको सिस्टीम तयार होऊन स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहे. दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्रासाठी १६.५ लाख कोटींचे सामंजस्य करार करण्यात आले असून यातील ७ लाख कोटींचे करार विदर्भासाठी करण्यात आले आहे. वर्ध्यासह विदर्भातील अन्य जिल्ह्यांमध्येही या माध्यमातून मोठी गुंतवणूक येणार आहे. गडचिरोली जिल्हा स्टील कॅपीटल म्हणून नावारुपास येत आहे. येत्या काळात वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली आणि नागपूर या जिल्ह्यांमध्ये लोहखनीजावर आधारीत उद्योग उभारणीसाठी राज्य शासनाने विशेष सवलत दिली असून या भागात मोठ्याप्रमाणात गुंतवणूकीचे प्रस्ताव शासनाकडे आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे वर्ध्यासह विदर्भातील दहा जिल्ह्यामधील काही दुष्काळग्रस्त भाग सुजलाम सुफलाम होणार असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकल्पाद्वारे गोसीखुर्द धरणातील ६२ टीएमसी सांडव्याद्वारे नव्याने ५५० कि.मी.ची नदी तयार करण्यात येणार आहे. यासाठी १ लाख कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेसाठीच्या सर्व मंजुरी देण्यात आल्या असून योजनेचा अंतिम आराखडा तयार होत आहे. यावर्षा अखेरी किंवा पुढील वर्षाच्या सुरवातीला या योजनेचे काम सुरु होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

वर्धा जिल्ह्यासाठी ऐतिहासिक क्षण पालकमंत्री डॉ. पंकज भोयर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आर्वी मतदार संघातील तीन तालुक्यांमधील ७२० कोटींच्या विविध ११ विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन झाले. या माध्यमातून वर्धा जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार असल्याचे, पालकमंत्री डॉ पंकज भोयर यांनी सांगितले.

राज्यातील ४७६ सरकारी शाळा या आदर्श शाळा बनविण्यात येत असून पहिल्या टप्प्यातील आदर्श शाळेचा शुभारंभ १४ एप्रिल २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या औचित्याने सुरु होणार असल्याचे सांगून शिक्षण क्षेत्रात या उपक्रमाद्वारे सकारात्मक बदल होणार असल्याचे ते म्हणाले. आर्वी विधानसभा क्षेत्रातील तीन शाळांचा यात समावेश असल्याचेही ते म्हणाले. करण्यात आला असल्याचे ते म्हणाले.

खासदार अमर काळे, आमदार सुमित वानखेडे, आमदार दादाराव केचे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी प्रास्ताविक केले तर आर्वी उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट यांनी आभार मानले.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रशासकीय इमारतीच्या लोकार्पणासह १० ई लोकार्पण व भूमिपूजन

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते आर्वी येथील नवीन प्रशासकीय इमारततीचे लोकार्पण झाले आणि १० महत्त्वाचे ई लोकार्पण व भूमिपूजनही झाले. त्यांनी आर्वी उपसा सिंचन योजनेचे ई लोकार्पण, गांधी विद्यालय आर्वी येथील नवीन इमारतीचे ई-लोकार्पण, आर्वी शहरातील नवीन स्विमींग पुलचे ई-लोकार्पण, आर्वी शहरातील अंतर्गत रस्त्याचे ई-भूमीपूजन,आर्वी शहरातील सारंगपूरी तलावाचे संवर्धन व सौदर्यीकरण ई-भूमीपूजन, आर्वी येथील उपजिल्हा रुग्णालयातील शंभर खाटाच्या रुग्णालयाच्या इमारतीचे ई-भूमीपूजन, पंतप्रधान सुर्यघर मोफत विज योजनेचे ई-लोकार्पण (सौरग्राम नेरी मिर्झापुर, तह-आर्वी), एमआयडीसीमध्ये कार्यांवित एचएएम टप्पा-२ अंतर्गत कारंजा तालुक्यातील रस्त्याचे ई-भूमीपूजन आणि १०० दिवसाच्या मोहिमेअंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सहा शासकीय वाहनांचे लोकार्पण केले.

## मॉडेल डिग्री कॉलेजमध्ये सामाजिक समता पंधरवडा निमित्य कार्यक्रम संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य सर्व समाजाला दिशादर्शक आणि विद्यार्थ्यांना प्रेरणा देणार आहे असे प्रतिपादन साहित्यिक सुरेश साबळे यांनी व्यक्त केला.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून समता पंधरवड्या अंतर्गत एका कार्यक्रमाचे आयोजन १२ एप्रीलला बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजमध्ये एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले






होते त्यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते ते पुढे म्हणाले की डॉ बाबासाहेब आंबेडकर कार्य आजही समाजाला दिशादर्शक ठरत आहे बुलढाणा जिल्ह्यातील पातुर्डा गावातील लोकांनी इंग्रजांना दिलेल्या नोटीसची दखल बाबासाहेबांनी घेऊन ते पातुर्डा येथे आले होते असं सांगत त्यांनी बुलढाणा जिल्ह्याशी जुळलेल्या ऐतिहासिक सामाजिक संदर्भांना उजाळा दिला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ अण्णासाहेब म्हळसणे हे होते यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी बाबासाहेबांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकून त्यांच्या कार्यावर दृष्टीक्षेप टाकला या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा वाघ यांनी सूत्रसंचालन डॉ दाभाडे मॅडम यांनी तर आभार प्रदर्शन प्रा ढोणे यांनी केले या कार्यक्रमाला मॉडेल कॉलेजमधील विद्यार्थी विद्यार्थिनी आणि प्राध्यापक उपस्थित होते.

# केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होमिओपॅथी जीवन गौरव पुरस्काराचे वितरण






दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नव्याने स्थापन केलेल्या आयुष विभागांतर्गत गेल्या दहा वर्षांमध्ये विविध कामे केल्या गेलीत आज भारतीय पारंपारिक योग अभ्यासाला जागतीकस्तरावर केल्या जात असून २१ जूनला हा दिवस जागतिक योगा दिन म्हणून सर्वत्र साजरा होत आहे असे प्रतिपादन असे प्रतिपादन केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केले.**

होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युएल हॅनिमन यांच्या जयंती औचित्य साधून होमिओपॅथी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या डॉक्टरांचा होमिओपॅथी जीवन गौरव पुरस्कारचे वितरण १२ एप्रिलला सत्कार करण्यात आला त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात आयुषमंत्री प्रतापराव जाधव बोलत होते ते पुढे म्हणाले की भारतीय आरोग्य सेवेत गुणवत्तापूर्वक उपचार पद्धतीत होमिओपॅथीची भूमिका ही महत्त्वपूर्ण राहिली आहे होमिओपॅथी उपचार पद्धतीच्या माध्यमातून व्याधी दुरुस्त करण्याचं काम केल जात आहे ही उपचार पद्धती विश्वास पात्र ठरत असून लोकांचाही कल या उपचार पद्धतीकडे वाढला आहे .नागरिकांना सहज आणि माफक दरात आयुर्वेदिक होमिओपॅथीची औषधी मिळावीत या दृष्टिकोनातून जनरिक औषधी केंद्राच्या धर्तीवर देशांतर्गत आयुषऔषधालय सुरू करण्यासंदर्भात केंद्र सरकाराचा विचाराधीन असल्यासचे ही त्यांनी सांगितले उल्हासनगर येथील प्रसिद्ध होमिओ तज्ञ डॉ. अमरसिंह गौतम, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या पळसखेडा येथील होमिओ तज्ञ डॉ. बाळासाहेब ना. महानोर, डेबको या होमिओपॅथी औषध निर्मिती संस्थेचे प्रमुख नंदकिशोर देशपांडे यांना होमिओपॅथी जीवनगौरव पुरस्कार देऊन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले या कार्यक्रमाला बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ कैलास झिने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ भागवत भुसारी जेष्ठ होमिओ तज्ज्ञ तथा पंचशील होमिओपॅथिक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. दादासाहेब कवीश्वर, आयएमएचे अध्यक्ष डॉ. अजित शिरसाट डॉ प्रशांत पाटील डॉ दुर्गासिंग राजपुत यांच्यासह युनानी होमिओपॅथी आयुष अंतर्गत काम करणारे डॉक्टर्स उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह’ अंतर्गत आरोग्य तपासणी व जनजागृती शिबीर

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** ‘‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह’’ कार्यक्रमाअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी जनजागृती शिबीर कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाला जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अनिल कावरखे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अविनाश पुरी, वैद्यकीय अधिकारी डॉ.हरन, परिचारिका कविता मारोती , भारती रोकडे, समाज कल्याण निरीक्षक सुभाष पट्टेबहादूर, आर. ए. शिरभाते, वरिष्ठ लिपीक आर. टी. चव्हाण आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या ज्येष्ठ नागरिकांची उच्च रक्तदाब व मधुमेह तपासणी करण्यात आली. त्यामध्ये एकूण ६७ नागरिकांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये २८ महिला व ३९ पुरुषांचा समावेश होता. तपासणी केलेल्या नागरिकांपैकी २३ ज्येष्ठ नागरिकांना मधुमेह व ३५ ज्येष्ठ नागरिकांना उच्च रक्तदाब असल्याचे आढळून आले. अशा ज्येष्ठ नागरिकांना आवश्यक औषधोपचार देण्यात आला तसेच त्यांचे मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाला जिल्ह्यातील पुरुष व महिला तसेच ज्येष्ठ नागरिक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच अनिल गायकवाड, व्यवस्थापक व स्मार्ट इंडिया प्रा. लि. कंपनीचे सर्व कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मद्यविक्री बंद

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** जिल्ह्यात १४ एप्रिल २०२५ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात येणार आहे. जयंती उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी जिल्ह्यातील सर्व किरकोळ अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी दिले आहेत.

मुंबई मद्य निषेध कायदा १९४९ चे कलम १४२ तसेच नमूद कायद्यांतर्गत केलेल्या विविध नियमानुसार जिल्हादंडाधिकारी यांनी १४ एप्रिल २०२५ रोजी जिल्ह्यातील सर्व किरकोळ मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशाच्या अंमलबजावणीमध्ये कुचराई करणाऱ्या मद्यविक्री अनुज्ञप्तीधारका विरुध्द मुंबई दारुबंदी कायदा १९४९ व अनुषंगिक नियमांच्या आधारे कडक कारवाई करण्यात यईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### ग्रामपंचायत सरपंच पदासाठी आरक्षण प्रक्रिया १६ एप्रिल रोजी

**वाशीम/प्रतिनिधी :** तालुक्यातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, वाशिम तालुक्यातील सन २०२५-२०३० दरम्यान सार्वत्रिक निवडणुकीव्दारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायत सरपंच पदाकरीता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्गाचे आरक्षण (प्रवर्गनिहाय महिला आरक्षण तसेच सर्वसाधारण महिला आरक्षणसह) १६ एप्रिल २०२५ रोजी वेळ सकाळी ११ वाजता नवीन सभागृह, तहसील कार्यालय, वाशीम येथे काढण्यात येणार आहे.

तरी, सर्व संबंधित नागरिकांना व ग्रामपंचायत सदस्यांना १६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता नवीन सभागृह, तहसिल कार्यालय, वाशीम येथे उपस्थित राहण्याचे या कार्यालयाकडून आवाहन करण्यात येत आहे. असे वाशीमचे तहसीलदार निलेश पळसकर यांनी कळविले आहे.

### सकाळी एकनाथ शिंदे अमित शाहांना एकांतात भेटले अन् दुपारी भरत गोगावलेंना मुंबईला बोलावले, चांगली की वाईट बातमी मिळणार?

**मुंबई/प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदासाठी इच्छूक असणारे शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने मुंबईला बोलावून घेतले आहे. एकनाथ शिंदे यांनी रविवारी सकाळी अमित शाह यांची मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर भेट घेतली होती. यावेळी एकनाथ शिंदे यांच्यासोबत अन्य कोणीही नव्हते. अमित शाह यांच्यासोबत एकनाथ शिंदे यांनी तब्बल अर्धा तास वन टू वन चर्चा केली. त्यानंतर दुपारी एकनाथ शिंदेंकडून भरत गोगावले यांना महाडवरुन मुंबईला येण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यामुळे आता मुंबईत रायगडच्या पालकमंत्रीपदाबाबत निर्णायक चर्चा होणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.अमित शाह यांनी शनिवारी रायगड किल्ल्यावरुन निघाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुनील तटकरे यांच्या घरी जाऊन भोजन केले होते. सुनील तटकरे यांची कन्या अदिती तटकरे या रायगडच्या पालकमंत्रीपदाच्या प्रबळ दावेदार आहेत. त्यामुळे सुनील तटकरे आणि अमित शाह यांच्यात काल रायगडच्या पालकमंत्रीपदाबाबत चर्चा झाली असावी, असा अंदाज आहे.

## ‘रुग्णालयांनी डिपॉझिटची मागणी करणे गैर नाही’ पुणे पालिकेच्या आदेशाला आयएमए चा विरोध!

**पुणे/प्रतिनिधी :** यापुढे पुण्यातील कोणत्याही रुग्णालयाने अनामत रक्कम मागू नये, असा आदेश पुणे महानगरपालिकेने काढला. मात्र, त्याला ’इंडियन मेडिकल असोसिएशन’ने विरोध केला आहे. अनामत रकमेची मागणी करणे गैर नाही, अशी भूमिका ’आयएमए’ने घेतली आहे. अनामत रक्कम न दिल्याने पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने गर्भवतीवर उपचार केले नाहीत. त्यामुळे प्रसूतिपश्चात तिचा मृत्यू झाला होता. या घटनेने राज्यात संतापाची लाट उसळली होती. डॉक्टरांच्या संघटनेने काढलेल्या पत्रकात असेही म्हटले आहे की, धर्मादाय रुग्णलयांना सरकारदरबारी काही सवलती मिळतात. त्यामुळे त्यांनी अनामत रक्कम मागू नये असे सांगणे एकवेळ मान्य करता येईल; पण अनेक लहान आणि मध्यम प्रकारची रुग्णालये आणि धर्मादाय रुग्णालये यामध्ये गल्लत करू नये. सर्वांना एकाच पारड्यात तोलू नये, असे इंडियन मेडिकल असोसिएशन’ने म्हटलेय.

## रक्तदान शिबिराला रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग



दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ८ ते १४ एप्रिल या कालावधीत ‘‘सामाजिक समता सप्ताह‘‘ साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहाच्या अनुषंगाने वाशीम येथे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्याचाच एक भाग म्हणून १३ एप्रिल रोजी सकाळी अकरा वाजता भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

समाज कल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालय वाशीम यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिर घेण्यात आले. या शिबिरात पन्नास पेक्षा अधिक रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकी जपली.रक्तदान शिबिरात रक्त संक्रमण अधिकारी डॉ. हरिता पिलाई, वैज्ञानिक अधिकारी (रक्तपेढी) गणेश वैद्य, जनसंपर्क अधिकारी एस. के. दंडे, अधिपरिचारिका दत्ता कागणे व प्रियंका सावंत, रक्तकेंद्र परिचर सुनील सावके, स्वामी सुभाष फुके व कु. सुनीता जाधव यांनी सक्रिय सहभाग घेतला व रक्तदात्यांचे रक्तदान करण्यात सहकार्य केले.या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी समाज कल्याण निरीक्षक राहुल अविनाश शिरभाते, संतोष जानू चव्हाण, सुमेध सुरेश खंडारे, कैलास सावळे, आशिष पांडुरंग कष्टे आदींनी विशेष परिश्रम घेतले. सामाजिक समतेचा संदेश पोहोचवणाऱ्या या उपक्रमामुळे जनजागृतीसोबतच आरोग्यविषयक सजगतेला देखील चालना मिळाली आहे.

## गाळमुक्त धरण,गाळयुक्त शिवार बीजेएसच्या प्रचार रथाचा पालक सचिव यांनी केला शुभारंभ

दैनिक आपला विदर्भ




**वाशीम/प्रतिनिधी :** ‘‘ गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार ‘‘ आणि नाला खोलीकरण व रुंदीकरण या मृद व जलसंधारण योजनेच्या अंमलबजावणी अभियानासाठी भारतीय जैन संघटनेने तयार केलेल्या प्रचार रथाचा शुभारंभ ११ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पालक सचिव गणेश पाटील यांनी हिरवा झेंडा दाखवून केला. यावेळी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस, मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती लता फड, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, मृद व जलसंधारण अधिकारी श्याम फेरवाणी यांच्यासह भारतीय जैन संघटनेच्या सुजलाम सुफलाम प्रकल्पाचे जिल्हा समन्वयक शिखरचंद बागरेचा आदींची उपस्थिती होती. जिल्हा प्रशासन व भारतीय जैन संघटना यांच्या संयुक्त वतीने जिल्हयात गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार या अभियानाचा गावागावात प्रचार प्रसार करण्याची जबाबदारी भारतीय जैन संघटनेच्या प्रचार रथाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. प्रत्येक गावापर्यंत आपलं गाव जलसमृद्ध करावं, गाव जल आत्मनिर्भर करावं असा प्रचार या रथाच्या माध्यमातून गावपातळीवर करुन जनजागृती करण्यात येणार आहे. प्रचार रथाच्या माध्यमातून तलावाचे पुनरुज्जीवन म्हणजेच गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार या अभियानाचा प्रचार गावागावात करण्यात येणार आहे.

## बीड जिल्हा रुग्णालयात डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मातेचा मृत्यू; नातेवाईकांचा गंभीर आरोप!

**बीड/प्रतिनिधी :** पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये तनिषा भिसे यांचा वेळेवर उपचार न मिळाल्याने मृत्यू झाला होता. हे प्रकरण ताजे असताना बीडमधून एक धक्कादायक बातमी समोर आलीय. बीड जिल्हा रुग्णालयात प्रसूतीदरम्यान मातेचा मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आलाय. छाया गणेश पांचाळ असे मृत मातेचं नाव आहे. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केलाय. प्रसूती व्यवस्थित करण्यासाठी पैशाची मागणी केल्यानंतर महिला कर्मचाऱ्यांना दोन हजार रुपये दिले, पैसे देऊन पण आमच्या रुग्णावर व्यवस्थित उपचार केले नाहीत, असा गंभीर आरोप मृतांच्या नातेवाईकांनी केलाय.

# सलोखा योजनेला मुदतवाढ ; शेतजमिनीचे वाद मिटवण्यास होणार मदत

## शेतकऱ्यांनो योजनेचा लाभ घ्या, जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राज्यभरात सलोखा योजना राबविण्यात येत असून या योजनेला १ जानेवारी २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. जिल्ह्यातील शेतजमीन मालकी हक्काबाबत होणारे वाद कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी या सलोखा योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे व दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे १२ वर्षेपासून असणाऱ्या शेतजमीन धारकांच्या अदलाबदल दस्तांसाठी मुद्रांक शुल्क नाममात्र १००० रुपये व नोंदणी फी नाममात्र १००० रुपये आकारण्याबाबत सवलत देण्यात आलेली आहे.

सलोखा योजनेचे फायदे :

१.शेतजमीनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतकऱ्याची जमीन अदलाबदलीनंतर क्षेत्र ज्याचे त्याचे नावे होतील.

२.शेतजमीनीचा कागदोपत्री ताबा मिळाल्याने शेतकऱ्यांना विहीर, शेततळे, पाईपलाईन, वृक्ष व फळबाग लागवडीबाबत शासनाच्या विविध योजनांचा फायदा होऊ शकणार आहे.

३.शेतकऱ्यांचे आपआपसातील वादामुळे अनेक शेतजमीन पडीक राहतात. वाद मिटल्यास शेतजमिनीच्या लागवडीखालील व वहितीखालील क्षेत्रात वाढ होऊन उत्पादनात वाढ होईल.

४.सलोखा योजनेच्या माध्यमातून परस्परविरोधी ताब्याबाबत असलेली विविध न्यायालयातील प्रकरणे निकाली निघणार आहेत.

जिल्ह्यातील शेतजमीन मालकी हक्काबाबत होणारे वाद मिटवण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरणारी आहे. शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा. या योजनेविषयी अधिक माहितीसाठी तहसील कार्यालय, तलाठी व मंडळ अधिकारी यांना संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

